Impact Factor : 3.4052(UIF)
Volume - 5 | Issue - 2 | Aug – 2015

साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त कथात्मक साहित्य

प्रा. डॉ. पांडुरंग एकनाथ शिवशरण
यशवंतराव चव्हाण महाविदयालय, तुळजापुर,
जि. उस्मानाबाद (महा.)

प्रास्ताविक :

मराठी वाङ्मय विश्वात कथा, कादंबरी, कविता, नाटक इत्यादी वाङ्मयप्रकारांची मोठी परंपरा आहे. मराठी वाङ्मयात या साहित्यप्रकारांनी कालखंडानुसार मोठी भर घातली आहे. मराठी वाङ्मयाच्या कक्षा या साहित्य प्रकारांनी मोठ्या प्रमाणात वाढविल्या. मराठी विश्वाचा विस्तार व विकास साधला आहे. कथा आणि कादंबरी या वाङ्मयप्रकारांना एक जूनी परंपरा असून, मानवी समाजाच्या जीवन व्यवहाराबरोबर प्रवास करणारे हे वाङ्मयप्रकार विशेष नावारुपाला आलेले आहेत. विविध घटकांनी एकत्रित बंदिस्त झालेले हे वाङ्मयप्रकार समग्र मानवी जीवनाशी सुसंवाद साधित असल्याने, मानवी जीवनाशी, त्यातील घटना व प्रसंगाशी या वाङ्मय प्रकारांची नाळ जोडली गेली आहे.

कथा आणि कांदबरी यांचा विस्तार मोठा असल्याने, समग्र मानवी जीवनाचा पट यात सामावलेला असतो. मानव, समाज आणि त्यांचं जीवन यांची सुसुत्रता या वाङ्मयप्रकारात केंद्रस्थानी असल्याने हे वाङ्मयप्रकार मानवी जीवनप्रवाहाशी समांतरपणे चालणारे आहेत. प्रस्तुत प्रकरणात 'साहित्य अकादमी' या केंद्र सरकारच्या स्वायत्त संस्थेतर्फे पुरस्कारप्राप्त कथात्मक वाङ्मयाचा विचार, त्याचे स्वरुप व मूल्यमापन विविधांगांनी करावयाचे आहे. कालक्रमानुसार पुरस्कारप्राप्त कांदबऱ्यांचे वेगळेपण सांगून, कादंबरीचे कथानक सांगतानाच ती कादंबरी लिहिण्याची पार्श्वभूमी विचारात घेता येईल, तसेच त्या लेखकाला लेखननिर्मितीस प्रवृत्त करण्याऱ्या प्रेरणा व त्या लेखकावर असणाऱ्या संस्कृतीचा प्रभाव विचारात घेवुन प्रस्तुत, लेखकाच्या अन्य लेखनाचा उहापोह करण्याचा मानस आहे.

१. ययाति :

वि. स. खांडेकर हे मराठी साहित्यविश्वातील एक नामवंत साहित्यिक, मराठी साहित्याला आपल्या लेखणीने समग्रतेने व्यापून टाकणारे एक प्रतिभाशाली साहित्यिक म्हणून खांडेकरांची ओळख साहित्याच्या परिघाला झालेली आहे. मराठी साहित्याच्या समीक्षाप्रांतात चर्चिले गेलेले वि.स.खांडेकर त्यांच्या अलौकिक अशा प्रतिभेतून अवतरलेल्या साहित्याच्या रुपाने आजही वाचकांच्यात लोकप्रिय आहेत. मराठी साहित्यविश्वाला नाविन्याचे दर्शन घडवून, खांडेकरांनी कथा, कादंबरी, ललित, रुपक, अशा बहुरंगी व बहुढंगी रुपाने आपल्या लेखनीचा अविष्कार साधला आहे.

खांडेकरांची लेखनी चौफेर दिशेने प्रकटली असली तरी शेवटी 'कथा' आणि 'कादंबरी' या दोन वाङ्मयप्रकारांनाच तिने विपूल प्रमाणात लेखन केले आहे. खांडेकरांचे बहुतांश लेखन कोकणात 'शिराढोण' येथे शिक्षकाची नोकरी करताना झाले. खांडेकरांनी साकारलेल्या साहित्यावर 'गांधीवादाचा' प्रभाव असल्याचे, समीक्षकांनी मतमतांतरे मांडलेली आहेत. त्यांच्या कलाकृतीत याची साक्ष देताना दिसतात. खांडेकरांनी मानवी जीवनाला आपल्या कथा, कादंबरीच्या माध्यमातून सजीव रुपाने साकार केले आहे. खांडेकरांनी हृदयाची हाक, कांचनमृग, दोन ध्रुव, उल्का, हिरवा चाफा, दोन मने, पांढरे ढग, रिकामा देव्हारा, सुखाचा शोध, पहिले प्रेम, क्रौंचवध, ययाति, अमृतवेल, जळलेला मोहर, अश्रू, असे विपूल प्रमाणात कादंबरी लेखन केले आहे. या त्यांच्या कादंबरी प्रवासातील 'ययाति' या कादंबरीने खांडेकरांना मराठी साहित्याच्या वैभव शिखरावर पोहचविले आहे. मराठी साहित्यविश्वाच्या परिघात 'ययाति' कादंबरीने मराठी साहित्याला मान-सन्मान व पुरस्काराच्या सर्वोच्चतेचा बहुमान मिळवून दिला. सर्वोच्च म्हणुन ओळखला जाणारा 'ज्ञानपीठ' पुरस्कार मिळवून मराठी कादंबरीला अलौकिकत्व प्राप्त करुन दिले. वि. स. खांडेकरांच्या साहित्यविश्वाबाबत डॉ. चंद्रकांत बंदिवडेकर म्हणतात की, "माणसाच्या भोगवादातून उद्भवणाऱ्या विनाशाचं उत्कट दर्शन" 'ययाति' च्या माध्यमातून घडविल्याचे सांगतात. खांडेकरांचे जे जीवनचिंतन सतत चालू होते, त्यातून त्यांनी लेखनाच्या प्रवासाला आरंभ केला. साहित्याच्या माध्यमातून मानवी जीवनाचा वेध घेणाऱ्या लेखकांपैकी वि.स. खांडेकर हे एक प्रमुख नाव आहे. मुख्यत: 'ययाति' च्या स्मरणगाथेतून खांडेकरानी ही कांदबरी लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. 'ययाति' ही एक पौराणिक

कथा आहे. खांडेकरांनी या कादंबरीतून पुराणकाळातील राजा 'ययाति' च्या जीवनाची कथा सांगितली आहे. या कादंबरीचे कथानक मानवी जीवनव्यवहाराला व्यापून टाकणारे असेच आहे. 'ययाति' या व्यक्तिरेखेतून साकारलेली पुरुष प्रतिमा, वर्तमान मानवी स्वभावाचे प्रतिनिधीत्व करताना दिसते. वर्तमान आणि पुराण यांच्या संयोगातून साकारलेली एक कथा म्हणजे 'ययाति' ही कांदबरी होय. ययातिच्या जीवनाची स्मरणगाथा सांगत पुढे जाणारी ही कांदबरी म्हणजे ययातिच्या जीवनाची क्रमिक कहाणी आहे हे सांगताना चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात,"मुख्यत: ययातिच्या स्मरणगाथेतून खांडेकरांनी ही कादंबरी लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. ही स्मरणगाथा ययाति थोड्याशा तटस्थपणे पुढे ठेवतो आहे. तिच्यात कथेचा क्रम आहे. तो क्रमश: जीवनाची कहाणी सांगतो आहे. अगदी बालपणापासून वानप्रस्थापर्यंतच्या संबंध जीवनाची ही क्रमिक कथा आहे." वरील मतातून वि.स. खांडेकरांच्या लेखन शैलीचे, आशयअभिव्यक्तीचे विवेचन समर्पकपणे व्यक्त केल्याचे दिसून येते. म्हणून अर्वाचिन मराठी वाङ्मयाच्या मध्यकालखंडातील एक महत्वाचे लेखक म्हणजे वि. स. खांडेकर होय. मराठी वाङ्मयाच्या कक्षेत मोलाची भर घालणारे तसेच मराठी वाङ्मयाला नाविन्याचे दर्शन घडविणारे एक प्रतिभासंपन्न व वैविधसंपन्न लेखक म्हणून वि. स. खांडेकरांचे नाव घ्यावे लागते. वि.स.खांडेकरांच्या 'ययाति' या कादंबरीने खांडेकरांची खरी ओळख मराठी साहित्यविश्वाला घडवून दिली. खांडेकरांच्या 'ययाति' या कांदबरीचे कथानक विचारात घेवून त्यांच्या कादंबरीचे वेगळपण मांडता येईल.

२. रथचक्र :

१९५० नंतरच्या मराठी कादंबरीकारामध्ये एक प्रतिभासंपन्न कादंबरीकार म्हणजे श्री.ना. पेंडसे मानवी मनाची ओढ असणाऱ्या लेखकांमध्ये श्री पेंडसे हे एक महत्वाचे नाव आहे. मानवी जीवनातील प्रसंग व त्याला सजीव करणारी माणसे उभी करण्याची पेंडसे यांची शैली त्यांच्या कादंबरीलेखनातील जमेची बाजू आहे. अनेक कारणांसाठी गाजलेली श्री.ना. पेंडसे यांची 'रथचक्र' ही कादंबरी १९६३ च्या साहित्य अकादमी पुरस्कारास पात्र ठरली आहे. अनुभवाला अनेक परिमाणे देणारी ही कादंबरी सामान्य व्यक्तींच्या सुख-दु:खातून, संघर्षातून जीवनाच्या घटना प्रसंगातून जीवनाचं रुप प्रस्तूत करणं हा पेंडशेंचा स्थायीभाव आहे. एका सामान्य स्त्रीच्या संघर्षातून फुलत गेलेली ही कथा नियतीबरोबर टक्कर देणाऱ्या कर्णाचं रथचक्र पृथ्वी सतत गिळते आणि कर्णाचा भव्योदात्त अन्त होतो. या दैवी कथेलाच नियतीच्या व माणसाच्या संघर्षरुपाने साकारताना दिसते. या कादंबरीची मूळ अनुभवव्यवस्था डॉ. द. भि. कुलकर्णी यांच्या मतांचा विचार करुन अधिक स्पष्ट करता येते. ते म्हणतात, "कादंबरीतील ही मूळ अनुभवव्यवस्था काय आहे? एका बाईचा आपल्या कौटुंबिक आयुष्याशी चाललेला संघर्ष,? दैव विरुध्द मानव ? रुढी विरुध्द विवेक?" वरील मतातून श्री.ना.पेंडसे यांच्या रथचक्र या कादंबरीतील जीवनचक्र हे संघर्षमय स्वरुपाचे कसे आहे त्याचे वास्तवपूर्ण विवेचन केले आहे.

श्री. ना. पेंडसे हे मराठी साहित्यातील एक प्रतिथयश लेखक आहेत. कोकणच्या मातीत जन्माला आलेले आणि मुरुड, दापोलीत जगले, वाढलेले पेंडसे मराठी सारस्वतात मोलाची भर घालून गेले आहेत. विशिष्ट प्रदेशातील मानवी जीवनाला शब्दबध्द करणाऱ्या पेंडसेंना एक प्रादेशिक कादंबरीकार म्हणून समिक्षकांनी उल्लेखिले आहे. कोकणच्या प्रदेशात जगलेल्या व अनुभवलेल्या जीवनाला पेंडसेंनी शब्दबाध्द केले आहे. या जीवनाला साकारताना या मातीतील माणसाच्या मनाला केंद्रस्थानी ठेवून पेंडसे यांनी कादंबरी, कथासंग्रह, नाटके, व्यक्तिचित्रणसंग्रह, आत्मचरित्र अशा विविध साहित्यप्रकारात आपल्या लेखणीचा विहार करुन दर्जेदार साहित्याची निर्मिती केली आहे.

साधारणत: १९५० च्या आसपास लेखनास प्रारंभ करणाऱ्या पेंडसेची 'एल्गार' ही पहिली कांदबरी १९४९ साली प्रसिध्द झाली. एका प्रतिभासंपन्न लेखकाची ओळख मराठी समिक्षक, वाचकांना झाली. पेंडसेंनी 'एल्गार' (१९४९), 'पाठोपाठ हद्दपार' (१९५०), 'गारंबीचा बापू' (१९५२), 'हत्या', 'कलदंर', 'रथचक्र', 'तुंबाडचे खोत' या व अशा विविध साहित्याची निर्मिती करणारे एक प्रतिथयश लेखक म्हणून श्री.ना. पेंडसेंचा नामोल्लेख केला जातो. म्हणूनच या प्रतिथयश लेखकाच्या कार्याचा गौरव म्हणून १९६३ चा साहित्य अकादमी पुरस्कार त्यांच्या 'रथचक्र' कादंबरीला प्राप्त झाला. 'रथचक्र' ही कादंबरी निर्माण झाली आणि या कादंबरीने अनेकागांनी नावलौकिक मिळविला आणि पेंडसेंच्या लेखनाला खरा न्याय मिळाला असे म्हटले तर वावगे ठरू नये.

मानवी जीवनात स्त्रीला असणारे स्थान, जीवन जगत असताना तिच्या वाट्याला येणारा संघर्ष आणि त्यातून तिची होणारी ससेहोलपट अशाच कांहीशा अंगाने 'रथचक्र' या कादंबरीची रचना झाल्याचे सांगता येते. म्हणूनच चंद्रकांत बांदिवडेकर तिला "दुर्दवाच्या फेऱ्यात आडकलेल्या अबलेची करुण कथा" असे म्हणतात. सामान्य स्त्रीजिवनाचं चक्र नियतीशी संघर्ष करताना पदोपदी चिखलात रुतत राहतं आणि ती स्त्री पराभूत होऊन निरर्थक जीवन संपवू पहाते असे श्री.ना.पेंडसे 'रथचक्र' मध्ये दाखवण्याचा प्रयत्न करतात. तसेच पेंडसेंनी दुर्भाग्याच्या आणि वचनेच्या चक्रव्यूहात अडकलेली स्त्री दु:खाच्या डागांनी कशी होरपळून निघते याचे प्रत्ययकारी व भावस्पर्शी चित्रण या कादंबरीत रेखाटले आहे. नियतीने जर माणसाचा छळ केला तर मानवी मनाची काय अवस्था होऊ शकते? हे पहायचे असेल तर 'रथचक्र' ही कांदबरी डोळ्यासमोर उभी राहिल असे मला वाटते. या कादंबरीत श्री. ना. पेंडसेनी कथानक, घटना, प्रसंग, निवेदन, पात्रचित्रण, भाषाशैली अशा सर्वच अंगांनी जीव ओतल्याने ती वेगळेपणाच्या कसोटीस पात्र ठरली आहे. म्हणूनच श्री. ना. पेंडसेंच्या समग्र लेखनात या कादंबरीचे वेगळेपण लक्षात घेण्यासारखे आहे. 'रथचक्र' या कादंबरीचे कथानक लक्षात घेवून या कादंबरीचे मूल्यमापन करता येईल.

३. स्वामी :

रणजित रामचंद्र देसाई यांचा 'स्वामी' ही पहिली कांदबरी १९६५ साली प्रकाशित झाली आणि अतिशय लोकप्रिय ठरलेल्या या कांदबरीला १९६४ चा 'साहित्य अकादमी पुरस्कार' मिळाला.

माधवराव पेशवे यांच्या जीवनावरील चरित्रात्मक, ऐतिहासिक कांदबरी लिहिणारे रणजित देसाई हे मराठीतील प्रतिथयश, लोकप्रिय साहित्यिक म्हणुन ओळखले जातात. रणजित देसाई यांनी कथा, कादंबरी, नाटक, लेखसंग्रह अशी वैशिष्ट्यपुर्ण साहित्यनिर्मिती करुन मराठी वाङ्मयक्षेत्रात मोलाची भर घातली आहे. वैविध्यपुर्ण साहित्याची निर्मिती करणारे रणजित देसाई एक कादंबरीकार म्हणुन प्रसिद्धीस आलेले आहेत. 'स्वामी' या देसाईच्या कांदबरीने मराठी साहित्याच्या अवर्तनात त्यांची एक वेगळी ओळख करुन दिली आहे. एखादी कलाकृती त्या लेखकाला कशी मोठी करते हे सांगताना डॉ. प्रल्हाद वडेर म्हणतात, "एखाद्या लेखकाचे नाव त्याच्या एखाद्या वाङ्मयकृतीशी इतके निगडीत होऊन जाते की, त्याच्या इतर वाङ्मय प्रकारांकडे रसिक-वाचकांचे दुर्लक्ष होते. इंग्रजीमध्ये जेन ॲस्टेन लेखिकेचे नाव तिच्या 'प्राईड ॲन्ड प्रेज्युडिस' या कादंबरीशी असेच निगडीत झालेले आहे. मराठीतही रणजित देसाई यांचे नाव 'स्वामीकार' म्हणूनच ओळखले जाते. " डॉ. वडेर यांनी रणजित देसाई यांना स्वामी कादंबरीने 'स्वामीकार' नाव देऊन एक वेगळी ओळख कशी दिली आहे हे स्पष्ट केले आहे.

एक वाचकप्रिय ऐतिहासिक कांदबरी म्हणून 'स्वामी' कादंबरीने लोकप्रियतेचे शिखर गाठले आहे. मराठी ऐतिहासिक कांदबरीमध्ये एक महत्वाचा मानदंड ठरावा, अशी 'स्वामी' कादंबरी होय. माधवराव पेशव्यांच्या इतिहासाला रणजित देसाई यांच्या लेखनशैलीने प्रभावीपणे साकारुन पेशव्यांचा इतिहास या कांदबरीच्या रुपाने परिचित करुन दिला आहे. ऐतिहासिक जीवनवास्तवाला प्रभावीपणे साकारणाऱ्या 'स्वामी' कांदबरीने एतिहासिक कांदबरीच्या परंपरेत स्वतंत्र युग निर्माण केले. ऐतिहासिक कांदबरीमध्ये ती एक सन्मानबिंदू ठरली.

ऐतिहासिक कादंबरीत 'मैलाचा दगड' ठरलेल्या या कादंबरीच्या लोकप्रियतेविषयी सांगताना डॉ.मीरा घांडगे म्हणतात, "कादंबरीची लोकप्रियता तिच्या शीर्षकातच आहे. हे शिर्षक सुरुवातीपासून शेवटपर्यंत एक वलय निर्माण करते." डॉ.मीरा घांडगे म्हणतात त्याप्रमाणे कांदबरीच्या शिर्षकापासून कादंबरीच्या लोकप्रियतेचा घाट तयार झाल्याचे मान्य करता येते.

'स्वामी' ही कादंबरी ऐतिहासिक कांदबरी असली तरी कथानकात व्यक्तित्वाला प्राधान्य देणाऱ्या घटना प्रसंगांची रेलचेल या कादंबरीत असल्याचे दिसुन येते. म्हणजे 'स्वामी' कादंबरी व्यक्तिकेंद्रीतेला प्राधान्य देणारी आहे असे म्हटले तर वावगे ठरु नये. स्वामी कांदबरीच्या व्यक्तीकेंद्रीतेविषयी सांगताना चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, "स्वामी ऐतिहासिक कांदबरी असली तरी ती तितकीशी कालकेंद्रित नसून व्यक्तिकेंद्रित आहे. ऐतिहासिक स्थल-कालाचे परिणाम म्हणजे एक व्यक्तित्वाला खुलवणारी चौकट आहे." बांदिवडेकर यांच्या मताचा परमार्श घेता असे दिसुन येते की, 'स्वामी' ऐतिहासिक कादंबरी असली तरी, कादंबरीतून साकारणारे ऐतिहासिक वातावरण कांदबरीतील व्यक्तित्वाला ऐतिहासिक बनवुन सामोरे आणते आणि 'स्वामी' कादंबरी व्यक्तिकेंद्रित आहे असे मान्य करावे लागते.

थोरल्या माधवरावांच्या चरित्रावर आधारलेली रणजित देसाई यांची 'स्वामी' ही कांदबरी मोठ्या साक्षेपाने लिहिली आहे. ही कांदंबरी लिहिण्याकरीता त्यांनी ऐतिहासिक ग्रंथ, ऐतिहासिक पत्रव्यवहार व बखरी यांचा खूपच अभ्यास केला असला पाहिजे, हे कादंबरीच्या कथानकातून दिसून येते. अभ्यासपूर्वक आणि इतिहासाला विश्वासात घेऊन लिहिलेली मराठीतील ही पहिलीच ऐतिहासिक कादंबरी असल्याचे अनेकानी मान्य केले आहे. तरीही एक उणीव प्रभावीपणे जाणवते ती म्हणजे - लेखकाने एवढ्या अभ्यासपूर्णतेने कादंबरीत इतिहास सांगितला आहे पण त्यांच्या अभ्यासपूर्णतेचा परिणाम त्यांच्या भाषेवर झालेला नाही. तो परिणाम साधला असता तर त्या भाषेनेच वाचकाला पेशवेकालात नेवून ठेवले असते असे मला प्रामाणिकपणे नमूद करावे असे वाटते.

४. व्यक्ती आणि वल्ली :

मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रात स्वतःचा ठसा उमटविणारे एक प्रतिभासंपन्न व अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणजे पु.ल. देशपांडे होय. मराठी विनोदाचे खरे जाणकार असणारे पु.ल. देशपांडे यांनी मराठी वाङ्मयाला आपल्या प्रतिभासंपन्नेतेने समृद्ध केले आहे. कथा, कादंबरी, नाटक, व्यक्तिचित्र, प्रवासवर्णने, इ. वाङ्मयप्रकारांची पु.लं. नी विपूल निर्मिती केली 'व्यक्ती आणि वल्ली' व्यक्तिचित्रे या संज्ञेने संबोधले गेलेले हे लेखन गेल्या पाच-सहा दशकात वाचकांच्या समोर आले. १९६२ साली लिहिलेल्या या व्यक्तिचित्रण कथासंग्रहास १९६५ सालचा 'साहित्य अकादमी' पुरस्कारही मिळालेला आहे.

पु.ल. देशपांडे यांनी व्यंकटेश माडगूळकर (माणदेशी माणसं), विद्याधर पुंडलीक (आवडलेली माणसे), यांच्या परंपरेवर आपले लेखन करुन एक वेगळीच छाप पाडली आहे. पु.ल.देशपांडे यांनी मराठी साहित्यविश्वाला आपल्या या व्यक्तिचित्रण कथासंग्रहातून मानवी स्वभावाच्या विविधांगांचे, पैलूंचे दर्शन घडविले आहे. म्हणूनच त्यांच्या व्यक्तिचित्रण संग्रहास 'साहित्य अकादमीने' ही गौरविले आहे. आपल्या समकालीन स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण करुन देणारे पु.ल. देशपांडे आजही मराठी वाचक, रसिकांच्या मनावर राज्य करताना दिसतात.

पु.ल. देशपांडे यांनी तुका म्हणे आता, अमंलदार भाग्यवान, तुझे आहे तुजपाशी, सुंदर मी होणार, तीन पैश्याचा तमाशा, राजा ओयिदपौस, एक झुंज वाऱ्याशी, ती फुलराणी, वटवट वटवट द्विदलं, मोठे मासे छोटे मासे, विठ्ठल तो आला आला, आम्ही लटके ना बोलू, वय मोठे खारे, नवे गोकुळ, पुढारी पाहिजे, अपुर्ण ई, पुर्वरंग, जावे त्यांच्या देशा, व्यंगचित्रे, खोगिरभरती, नस्ती उठाठेव, गोळाबेरीज, हसवणूक, बटाट्याची चाळ, असा मी असामी, खिल्ली, कोट्याधीश पु.लं, अघळपगळ, उरलंसुरलं, परचूंडी, एक शुन्य मी, मुक्काम शांतीनिकेतन, मराठी वाङ्मयाचा (गाळीव) इतिहास, चित्रमय स्वागत, रसिकाहो, मित्रहो, श्रोतेहो, सृजनहो, रेडिओवरील भाषणे आणि श्रुतिका, भाग १, चार शब्द दाद, व्यक्ति आणि वल्ली, गणगोत, गुणगाईन आवडी मैत्र, आपुलकी, गांधीजी, एका कोळीयाने, काय वाट्टेल ते होईल, कान्होजी आंग्रे, टेलिफोनचा जन्म, स्वर्ग, पोरवय इ. विपूल आणि समृद्ध वाङ्मयनिर्मिती पु.ल. देशपांडे यांनी केलेली आहे. कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, ललितलेखन, व्याख्याने, व्यक्तिचित्रण, असे वाङ्मयाचे विविध प्रकार हाताळणारे पु.ल. देशपांडे मराठी वाङ्मयाच्या परिघात

विशेषच नावाजले गेले आहेत. मानवी स्वभावाच्या वृत्ती प्रवृत्तीचे अतिशय प्रभावीपणे रेखाटन पु.लं. नी त्यांच्या 'व्यक्ती आणि वल्ली' या साहित्यकृतीतून साकारले आहे, म्हणूनच पु.लं.च्या समकालीनात मराठी वाङ्मयाच्या विश्वात त्यांनी स्वतःच्या नावाचा ठसा उमटविला आहे.

'व्यक्ती आणि वल्ली' हा व्यक्तिचित्रणात्मक कथासंग्रह असून, यातून पु.लं. च्या व्यक्ति स्वभावचिंतनातून साकारलेल्या मानवी प्रवृत्तीचे अतिशय विनोदी अंगानी दर्शन घडविले आहे. जीवनाच्या प्रवासात विनोदी आढळलेल्या व्यक्तींच्या चित्रणाला पु.लं. च्या प्रतिभेने अतिशय परिणामकारक बनविले आहे. जीवनात भेटत गेलेल्या व्यक्तींना मी कसा चित्रित गेलो हे सांगताना पु.ल. म्हणतात, "एकोणीशे चव्वेचाळीस साली 'अभिरुची' त मी 'भैय्या नागपूरकर' नावाचे एक लहानसे व्यक्तिचित्र लिहिले. तेव्हापासून एकसष्ट सालापर्यंत ही व्यक्तिचित्रे आहेत. विसावे शतक चाळीशित शिरले तेंव्हा मी विशित शिरलो होतो आणि शतकाने साठी ओलांडली आणि मी चाळिशीत आलो" आपल्या जीवन प्रवासात या व्यक्तिचित्रणाला कसा प्रांरभ झाला हे पु.ल. नी अतिशय नेमकेपणाने मांडले आहे. पु.ल. देशपांडे यांनी 'अभिरुची' मासिकातून आपले पहिले व्यक्तिचित्र साकार केले आणि जाणकार वाचक मंडळींना विचारप्रवृत्त केले या काळात विनोदाच्या क्षेत्रावर नाव कोरलेले अनेक मान्यवर होते. यात प्र.के. अत्रे, शामराव ओक, चि.वि. जोशी या मानकऱ्यांची प्रमुख नावे सांगता येतील. असे हे विनोदवीर जनतेच्या मनावर खोलवर रुजले होते. तरीही पु.लं. यांचे कसब वेगळे आणि डोळ्यात भरण्यासारखे होते. पु.लं च्या नव्या अविष्काराला भरपूर प्रतिसाद मिळत गेला आणि समकालीनात पु.लं. चे विशेष नावं चर्चिले जाऊ लागले. पु.लं.च्या प्रतिभेचा अनेकांगी विकास व विस्तार झाला. त्यांच्या प्रतिभेने विविध ढंग परिधान केले. संगीत, रंगभूमी, चित्रपट अशा साऱ्याच क्षेत्रात त्यांची प्रतिभा, संपन्नता दिसून येते.

पु.लं. नी मानवी जीवनाला त्यांच्या व्यवहाराला खूप जवळून पाहिले. जीवनाच्या एकसुरीपणाला दूर सारुन विविध तऱ्हा धुंडाळल्या आणि कल्पक नजरेने माणसातील विसंगती हेरली. त्या विसंगतील इतक्या प्रत्ययकारीतेने मांडले की, साऱ्या महाराष्ट्रभर विनोदाची लाट पसरली. पु.ल. देशपांडे मराठी साहित्यविश्वाला सर्वांगाने परिचयाचे झाले. पु.लं.नी जीवनातील विसंगती साकारतानाच मानवी स्वभावाचे विविध नमुने अतिशय कल्पक बुद्धीने शब्दबद्ध केले, म्हणून 'मराठी विनोदाचे राजे' असे पु.लं. ना संबोधले तर अतिशयोक्ती वाटू नये.

मानवाच्या जीवनातील विसंगतील अतिशय नेमकेपणाने हेरणारे पु.ल. विसंगती हा मानवी स्वभावाचा गुणधर्मच कसा आहे? हे दाखवून देतात. पु.लं. नी 'व्यक्ती आणि वल्ली' साकारत असताना अंतर्मुख करणाऱ्या विनोदाला केंद्रस्थानी ठेवल्याने त्यांच्या विनोदाची परिणामकारकता एवढ्या मोठ्या प्रमाणावर सिद्ध झाली की, या पुस्तकाच्या सन २०१० पर्यंत तब्बल तेहत्तीस आवृत्या निघाल्या. या पुस्तकाने मानवी मनाचा ठाव कशा पद्धतीने घेतला याचा अंदाज येऊ शकतो.

पु.ल. देशपांडे यांनी आपल्या या व्यक्तिचित्रण संग्रहातून माणुसकीची जाण ठेवून वीस व्यक्ती आणि त्यांच्या वल्ली रेखाटल्या आहेत. या व्यक्तिरेखा पु. लं. च्या आतून उमलून आलेल्या आहेत आणि या साकार झाल्या त्या केवळ आणि केवळ निखळ मनोरंजन करण्याच्या हेतुने. या विनोदातही पु.लं.च्या निरीक्षणशक्तीची ओळख होते. त्यांच्या नेमकेपणाचाही अभ्यास होतो. हे सांगतानाच प्रा. सुधीर जोशी म्हणतात, " पु.लं. ची निरीक्षणशक्ती केवळ अपारच नाही तर ती नेमकी व मार्मिकही आहे. व्यक्ती आणि वल्लीत ही निरीक्षणशक्ती आपणाला प्रदेश, भाषा, संस्कृती, सभ्यता व चिरंतन मुल्यांची अनोखी सफर घडवून आणते." प्रा. जोशी यांनी पु.लं. च्या नेमकेपणाला आधोरेखीत करतानाच त्यांच्या दृष्टीकोनालाही विशद केले आहे. पु.लं. मानवी प्रवृत्तीला आधोरेखीत करतानाचा भाषा, संस्कृती, सभ्यता आणि मूल्यव्यवस्था यांचीही विविधता सामोरे आणतात.

'व्यक्ती आणि वल्ली' या व्यक्तिचित्रणात्मक कथासंग्रहात पु.लं. नी एकूण वीस व्यक्ती आणि वल्लींची कथा सांगितली आहे. अतिशय नेमक्या, परिणामकारक आणि विनोदी अंगाने रंगलेल्या या व्यक्तींच्या जीवनाच्या कथा कथानकातून अभिव्यक्त झाल्याचे दिसून येते.

५. काजळमाया :

१९६० नंतरच्या मराठी नवकथेला पुढे नेणारे एक महत्वाचे कथाकार म्हणून जी.ए. कुलकर्णी ओळखले जातात. १९६० नंतरच्या कालखंडात मराठी कथेत अनेकविध प्रवाह प्रसार पावले. त्यातील एक महत्वाचा प्रवाह म्हणजे 'घटनाप्रधान कथा'. १९६० नंतर मराठी कथेचा मुख्य प्रवाह म्हणून या प्रवाहाला संबोधले जाते. १९६० नंतरच्या या प्रवाहात लेखन करणारे महत्वाचे कथाकार पुढे आले ते जी. ए. कुलकर्णी होय. जी. एं. च्या समकालीनात चि. त्र्यं. खानोलकर, विद्याधर पुंडलिक, शरदचंद्र चिरमुले, आनंद विनायक जातेगावकर आणि श्री. दा. पानवलकर यांची नावे प्राधानान्याने घेतली जातात. परंपरेला बाजूला सारुन अनुभव, विषय आणि संवेदन स्वभाव या नवीन संकल्पनांना साकारणारे हे कथाकार वैशिष्ट्यपूर्ण असेच आहेत म्हणावे लागतील.

१९६० नंतर वैशिष्ट्यपूर्ण आणि स्वतःच वेगळी ओळख निर्माण करणारे जी.ए. मराठी कथेवर स्वतःचा ठसा उमटावित गेले. जी. एं. च्या कथाप्रवासात 'निळासावळा' ते 'रक्तचंदन' आणि 'काजळमाया' ते 'पिंगळावेळा' असे दोन प्रमुख टप्पे दिसून येतात. पहिल्या टप्प्यातील कथा सामाजिक, वास्तववादी, कौटुंबिक आहेत तर दुसऱ्या टप्प्यातील कथा या प्रतिकात्मक, तत्वज्ञानात्मक असलेल्या दिसून येतात. तर या दोन्ही प्रकारच्या कथांचा समावेश असलेला 'काजळमाया' कथासंग्रह जी. एं.ची वेगळी ओळख करुन देणारा ठरतो. या दोन्ही टप्प्यांना या कथासंग्रहाने अतिशय परिणामकारकतेने साकारले आहे.

जी. ए. कुलकर्णी यांचा पहिला कथासंग्रह १९५९ साली प्रकाशित झाला. या कथासंग्रहाच्या रुपाने पडलेले जी. एं. चे पाऊल १९७७ पर्यंत मराठी कथेच्या परिघात सर्वत्र फिरत राहिले. १९७७ पर्यंत जी. एं. चे आठ कथासंग्रह प्रसिद्ध झाले. त्यातील दोन कथासंग्रहाला शासनाची पारितोषिकही मिळाली तर अशा वैविध्यपूर्ण कथांना चोखंदळ वाचकांचे लक्षही वेधून घेतले. रसिकमान्यता आणि समिक्षकमान्यता

या दोन्ही कसोट्यांवर जी.एं. ची कथा यशस्वी ठरली आहे. त्यांच्या 'काजळमाया' या कथासंग्रहाला साहित्य अकादमीचा मानाचा पुरस्कार प्राप्त झाला.

माणसाच्या जगण्याला आणि त्या जगण्यातील वैविध्यांना टिपणाऱ्या 'काजळमाया' कथासंग्रहातील कथा वाचकांच्या अंतरमनाचा वेध घेणाऱ्या आहेत. मानवी स्वभावाची गुढता चितारणाऱ्या या कथा वाचकांवर दिर्घकाळ परिणाम करतात. जी.एं.नी प्रतिमांचा केलेला योग्य वापर त्यांच्या कथेतील शोकात्म अनुभवाला अधिक गडद करतो. मुलभूत प्रेरणांचा शोध घेत, वैचारिक संवेदनशिलतेला टिपण्याचे कार्य या कथा करतात. या कथांतून साकारणारे व्यक्तिचित्रण आणि त्यांचे मनोविश्लेषण यांचीही वैचारीक भूमिकेशी सांगड जी.एं.नी घातलेली दिसते. एकूणच तात्विक मुल्यांचा शोध घेत मानवी मनाच्या गुढतेचा शोध जी. ए. कुलकर्णी यांच्या 'काजळमाया' या कथासंग्रहातून स्पष्ट केल्याचे दिसून येते.

जी.एं.च्या समर्थ प्रतिभेने साकारलेल्या या कथा मानवी जीवनाच्या सर्वांगाला स्पर्श करणाऱ्या आहेत. 'काजळमाया' या कथासंग्रहातून साकारणाऱ्या कथांनी मानवी जीवनातील विविधांगाना व्यक्त केलेले आहेत. जी. एं. च्या सखोल मानवी चिंतनातून साकारलेल्या या कथा म्हणूनच प्रभावी आणि प्रत्ययकारी ठरतात. माणूस आणि त्याचे जगणे या विश्वाला जी. एं. ची कथेच्या स्वरुपाविषयी व मूल्यमापनाविषयी अंजली सोमण म्हणतात की, "माणूस हा जगण्याची इच्छा बाळगणारा शुद्र, स्वार्थी व आत्मकेंद्रित प्राणी आहे. जीवनाचा अर्थ शोधण्याची किंवा मुल्यांची जपणूक करण्याची त्याची धडपड व्यर्थ आहे. कारण त्याच्या कर्तृत्वशक्तीची सुत्रे अदृश्य नियतीच्या हाती आहेत. म्हणूनच माणसाने स्वत:विषयीचा अहंकार, बाद्धिक गर्व व कर्तत्वाची घमेंड इत्यादी गोष्टी मनाशी बाळगल्या की, त्याची स्थिती हास्यास्पद होते. माणूस माणसाची शिकार करतो. पण या घटनेबद्दल कुणालाच दोष देता येत नाही. कारण कर्ता करविता वेगळाच असतो व जे घडते ते अटळ असते. जीवनाची ही आगतिकता मुल्यशून्यता व नात्यांचा, भावनांचा खोटेपणा जावणल्यामूळे एकाकी पडलेल्या माणसाचे चित्रण जी. ए. कुलकर्णी यांच्या कथांमधून घडते."[४८] जी.ए. कुलकर्णी यांच्या कथा, कथासाहित्याचे स्वरुप अत्यंत तात्विक, मार्मिक, वैचारिक भूमिकेतून स्पष्ट केलेले आहेत. कारण, जी. एं.ची कथा जीवनाचा मतितार्थ शोध घेताना मानवी मनाची गुढत्व, बौध्दिक अहंकार, या अनेक कारणामुळे मानवी जीवनाचे जगणे हे व्यर्थ स्वरुपाचे कसे होते. याचे प्रत्ययकारी विवेचन डॉ. अंजली सोमण यांनी स्पष्ट केलेले आहे.

जी. एं. नी मानवी जीवनातील वैविध्याला अतिशय परिणामकारकतेतून त्यांच्या 'काजळमाया' या कथासंग्रहातील चौदा कथांतून मांडले आहे. या कथांच्या कथानकाचा विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

६. स्मरणगाथा :

मराठी साहित्यविश्वात अतिशय आदराने उच्चारले जाणारे एक ख्यातनाम साहित्यिक म्हणून गो. नि. दांडेकरांची ओळखआहे. कादंबरी हा दांडेकरांच्या आवडीचा लेखनप्रांत. दांडेकरांनी ऐतिहासिक, चरित्र्यात्मक, आत्मचरित्रात्मक, कादंबऱ्यांचे लेखन केले आहे. 'शित पडघवली', 'माचीवरचा बुध' या व अशा अनेक कादंबऱ्यांचे लेखन गो. नी. दांडेकरांनी केले आहे. या त्यांच्या साहित्यकृती मराठी रसिकांत अतिशय लोकप्रिय ठरलेल्या आहेत. कादंबरीलेखनात आपला हातखंडा दाखविणारे प्रवासवर्णन, स्थलवर्णने अशा साहित्यप्रकारांनाही हाताळताना दिसतात. दांडेकरांनी अशा विविध साहित्यप्रकारात लेखन करुन विपूल वाङ्मयनिर्मिती केली आहे.

धार्मिक व पौराणिक विषय हाताळण्याचे दांडेकरांचे एक लेखन विशेष असल्याचे सांगता येते. दांडेकरांची लेखनी बालमनाचाही ठाव घेताना दिसते. बालकांसाठी अनेक उद्बोधक विषयावर पुस्तके लिहून बालकांचे मन संवेदनशील करण्यासाठी दांडेकरांनी कुमार वाङ्मयाचीही निर्मीती केली आहे. कथा, कादंबरी, नाटक, ललित, चरित्र, आत्मचरित्र, बालवाङ्मय, कुमारवाङ्मय अशा वाङ्मयाच्या सर्वच क्षेत्रात दांडेकरांच्या प्रतिभासंपन्नतेची झलक पहावयास मिळते. अशा प्रकारे विविध साहित्यप्रकारांत लेखन करणाऱ्या दांडेकरांची 'स्मरणगाथा' ही आत्मचरित्रात्मक कादंबरी विशेषच नावारुपाला आली आणि म्हणून त्यांच्या साहित्याचा उचीत सन्मान म्हणून दांडेकरांच्या 'स्मरणगाथा' या आत्मचरित्रात्मक कांदबरीस 'साहित्य अकादमीचा' पुरस्कार प्राप्त झाला आहे.

'स्मरणगाथा' ही आत्मचरित्रात्मक कादंबरी लिहिणाऱ्या गोपाळ निळकंठ दांडेकरांचा जन्म ८ जुलै १९१६ रोजी विदर्भातील 'परतवाड्यात' झाला. दांडेकरांचे पाचवीपर्यंतचे शिक्षण परतवाड्यालाच झाले. त्यानंतर १३ व्या वर्षी घरातून पळून गेले. ते २४ व्या वर्षापर्यंत या भटकंतीच्या काळात त्यांना आलेल्या अनुभवांना दांडेकरांनी 'स्मरणगाथेतून' शब्दबद्ध केले आहे. 'स्मरणगाथा' हे गो.नी. दांडेकरांचे 'आत्मचरित्र' होय. या आत्मचरित्राचे शिर्षकच आत्मचरित्रातील आशयाला समर्पकतेने वाचकासमोर मांडते. दांडकरांनी भूतकालीन आयुष्यातील आठवर्णीना 'स्मरणगाथे' च्या रुपाने संस्मरणीय केले आहे. या आत्मचरित्रातील आठवर्णीविषयी बोलताना स्वत: दांडेकर म्हणतात की, 'या लिखाणाचे स्वरुप आत्मचरित्रापेक्षा स्मरणसाखळीसारखे आहे.' दांडेकरांनी आपल्या आत्मचरित्राला स्मरणसाखळी असे म्हटले आहे आणि ते योग्यही वाटते. त्यांच्या एकूणच स्मरणगाथेत त्यांना जे लोकविलक्षण अनुभव आले. त्यांनी भोगलेले, पाहिलेले आत्मानुभव सांगितले आहेत. म्हणूनच त्यांनी कथन केलेले अनुभवविश्व एका साखळीसारखे गुंफत गेलेले आहेत असे मला प्रामाणिकपणे वाटते.

धार्मिक जीवनाचा मोठा प्रभाव असणाऱ्या दांडेकरांनी संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, समर्थ रामदास स्वामी, संत नामदेव महाराज, संत एकनाथ महाराज, संत तुलसीदास यांच्या जीवनावर अधारीत मोठे लेखन करुन समाजाला एक आध्यात्मिक संस्काराची दिशा देण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे. दांडेकरांनी ऐतिहासिक जीवनाला शब्दबद्ध करताना वर्तमान जीवनाला सामोरे ठेवून इतिहासाचे रेखाटन केले आहे. दांडेकर हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्व असल्याचे मान्य करावे लागते. दांडेकरांच्या या प्रतिभासंपन्नतेविषयी व कलासक्ततेविषयी

सांगताना डॉ. यशोदा पाटील म्हणतात की,"गड, किल्ले, छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांच्या किल्ल्यांवर विलक्षण प्रेम करणारे गोपाळ निळकंठ दांडेकर हे कथा, कादंबरीकार म्हणून जसे ओळखले जातात तसेच एक कलासक्त कलंदर व्यक्तिमत्व लाभलेले साहित्यिक म्हणूनसुद्धा ओळखले जातात"[६२] वरील मतातून डॉ. यशोदा पाटील यांनी गो. नी. दांडेकरांच्या एकूण व्यक्तिमत्वाच्या विविध पैलूंची जाणीव करुन देण्याबरोबरच त्यांच्या साहित्यनिर्मितीविषयी मार्मिक भाष्य केलेले आहे असे मला वाटते. गो. नी. दांडेकर हे एक बहुआयामित्व लाभलेले व्यक्तिमत्व आहे असे म्हटले तर वावगे ठरू नये.

७. सत्तातंर :

व्यंकटेश माडगुळकर हे मराठी साहित्यातील एक प्रतिभासंपन्न लेखक म्हणून महत्वाचे आहेत. व्यंकटेश माडगुळकरांनी कथा, कांदबरी, व्यक्तिचित्रण असे वैविधपूर्ण साहित्यनिर्मिती केली आहे. त्यांच्या ग्रामीण साहित्याला मराठी वाचक, रसिकांनी यशाच्या शिखरावर पोहचविलेले आहे. माडगुळकरांचा खरा पिंड कथाकाराचा, परंतु माडगुळकरांनी काही मोजक्या पण दर्जेदार कांदबऱ्याही लिहिल्या आहेत. आपल्या प्रतिभाशक्तीने माणदेशी जीवनाला सजीवंतपणा प्राप्त करुन दिला आहे. व्यंकटेश माडगूळकरांनीच मराठी साहित्याला प्रादेशिकतेची खरी ओळख करुन दिली आहे. माडगुळकरांनी मराठी साहित्याच्या प्रवाहात परिवर्तन घडवून आणतानाच त्यांनी कांदबरी वाङ्मयात प्रायोगिकता आणण्याचा प्रयत्न केला आहे. मानवी जीवनाला, प्रदेशाला साकारणे माडगुळकर माणसाचा स्वभाव, वृत्ती, भाव-भावना यांनाही अतिशय कलात्मकतेने चित्रीत करतात.

बहुआयामित्व लाभलेले असे हे व्यंकटेश माडगूळकरांचे व्यक्तिमत्व आहे. माडगुळकरांचे कार्य आणि कर्तत्वाचा बहुमान करताना टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने ज्ञानप्रवाहातील अत्युच्य असणारी 'डी. लिट.' पदवी देवून त्यांचा सन्मान केला आहे. एका सर्वगुणसंपन्न कलावंताचे गुण व्यंकटेश माडगुळकरांच्या व्यक्तिमत्वात दिसून येतात. कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, स्फुटलेखन, ललितलेखन, माहितीपर लेखन, शिकारीची वर्णने, चित्रपटकथा इ. असे विविधांगी लेखन करणारे माडगुळकर चित्रपटातील भूमिका, असे अनेक कलागुणांनी लोकप्रिय झालेले आहेत. हे सर्वज्ञ आहे.

मानवी जीवनाला प्रभावीपणे साकारणारी व्यंकटेश माडगुळकरांची प्रतिभा, मानवजातीची वन्यावस्था आणि त्यांच्या संस्कृती संस्काराची प्राथमिक अवस्था अतिशय सरलतेनी व मन:पुर्वकतेने 'सत्तांतर' कादंबरीतून रेखाटले आहेत. प्राण्यांच्या दैनंदिन चाली-रितींचा बारकाईने अभ्यास करुन, त्यांच्यातील स्थलपरत्वे बदलेले बारकावे सुक्ष्म नजरेने टिपले आहेत. अशी ही आगळ्या-वेगळ्या विषयावरची माडगुळकरांची कादंबरी मराठी साहित्याच्या विश्वात खूपच चर्चिली गेली आहे. प्रसंगी कांदबरीवर टिकाही झाली, तरीही मराठी साहित्याला प्रादेशिकतेची ओळख करुन देणारी 'सत्तांतर' कादंबरी यशस्वीतेचे शिखर सर करुन 'साहित्य अकादमी' सारख्या सर्वोत्कृष्ट पुरस्कार प्राप्त झाला, हे मराठी साहित्याचे एक मोठे भाग्यच मानावे लागेल असे मला वाटते.

मानवी समाज, त्याची भाषा, त्याची संस्कृती, त्याची मूल्यव्यवस्था, त्याचा प्रदेश अशा अनेकांगानी माडगुळकरांच्या प्रतिभाशक्तीने अतिशय कलात्मकतेने साकारल्याने माडगुळकर हे एक मराठीतील एकमेवद्वितीय आहेत. त्यांच्याविषयी म.द. हातकणंगलेकर म्हणतात, "व्यंकटेश माडगुळकरांचे वेगळेपण आपल्याला कसे जाणवते? मराठीतले अनेक ललितकलांमध्ये गती असणारे आणि त्यात गुणवत्तेने वावरणारे साहित्यिक आहेत. या प्रकाराचा दुसरा साहित्यिक मराठीत शोधून सापडणे कठीण आहे. अन्य भारतीय भाषांत असू शकतील पण मराठीत दुर्मीळ."[७४] वरील मत म.द. हातकणंगलेकरांनी व्यंकटेश माडगुळरांचे श्रेष्ठत्व सिद्ध करताना मराठीत अशा प्रतिभेचा दुसरा लेखक सापडणे केवळ अशक्य असल्याचे सांगितले, म्हणजे व्यंकटेश माडगुळकरांच्या कथात्मक साहित्याचे स्वरुप सांगून त्यांचे विवकाधिष्ठित भूमिकेतून मुल्यमापन केल्याचे दिसून येते.

अशा या प्रतिभासंपन्न साहित्यिकाने मराठी साहित्याच्या परिघात मोलाची भर घातली आहे. माडगुळकरांनी १८ कथासंग्रह, ८ नाटके, ८ कांदबऱ्या, १ प्रवासवर्णने, १ व्यक्तिचित्र, ८ ललित, ५ अनुवाद इ. साहित्यप्रकारांची निर्मिती केलेली आहे. अशी वैशिष्ट्यपूर्ण साहित्यनिर्मिती करणारे माडगूळकर जीवनानुभवाचा सार या लेखनातून अतिशय कलात्मकतेने आपल्या कलाकृतीने स्पष्ट केलेले आहे.

माडगूळकरांनी वन्यजीवांवर अधारित असणारी 'सत्तांतर' ही कादंबरी वेगळ्या स्वरुपाची आहे. माडगुळकरांनी मानवाचा आदिम भाव अनुभूतीही सत्ताकांक्षा आणि त्यातून उफाळलेला सत्तासंघर्ष आपल्या कांदबरीतून कथन केला आहे. 'सत्तांतर' कांदबरीचे कथानक विचारात घेऊन तिच्यातील कथाबीजांचा विचार करताना 'सत्तांतर' या कांदबरीचे स्वरुप व मूल्यमापन स्पष्ट केलेले आहे.

८. झाडाझडती :

मराठीतील आजच्या पिढीतील एक ख्यातनाम लेखक म्हणून विश्वास पाटील प्रसिद्ध आहेत. शालेय जीवनापासून वाचन आणि लेखनाची आवड जोपासणारे विश्वास पाटील आजही वाचन आणि लेखन मोठ्या प्रमाणावर करताना दिसतात. कोल्हापूर जिल्ह्यातील नेर्ले या वारणाकाठी असलेल्या खेडेगावात ते जन्मले, ग्रामीण जीवनाचे सुक्ष्म निरीक्षण हा त्यांच्या चिंतनाचा, लेखनाचा विषय ठरलेला आहे. या चिंतनातूनच विश्वास पाटील यांनी बहुविध प्रकारचे लेखन केलेले आहे. गेल्या वीस वर्षात दर्जेदार कादंबरी लेखन करुन विश्वास पाटील यांनी ऐतिहासिक, सामाजिक कादंबऱ्यांचे लेखन केले आहे. 'पानिपत', 'पांगिरा', 'झाडाझडती', 'महानायक' अशा स्वरुपाच्या कादंबऱ्यांचे लेखन केले आहे. पाटील यांच्या कादंबऱ्या विद्वान समीक्षक आणि मराठी वाचक दोन्ही स्तरांत मान्यता पावल्या आहेत. मराठी वाचकांबरोबर त्यांच्या

कांदबरीने हिंदी, गुजराती, बंगाली वाचकांनासुद्धा विलक्षण संमोहित केलं आणि म्हणूनच त्यांच्या 'झाडाझडती' या ग्रामीण जीवनाची शोकपूर्ण महागाथा सांगणाऱ्या कांदबरीला १९९२ चा 'साहित्य अकादमी' पुरस्कार मिळाला.

विश्वास पाटील यांच्या कांदबरी लेखनाने त्यांच्या असामान्यत्वाची ओळख करुन दिली आहे. 'झाडाझडती' ही कादंबरी त्यांच्या वर्षानुवर्षे चाललेल्या सामाजिक निरिक्षणातून आणि चिंतनातून जन्माला आलेली आहे. 'झाडाझडती' ही विश्वास पाटील यांची कांदबरी मराठी कांदबरीक्षेत्रतील वास्तववादी लिखाणाची परंपरा जोपासणारी आहे, असे म्हटले तर वावगे ठरु नये. 'झाडाझडती' या कांदबरीतून विश्वास पाटील यांनी आपला देश, समाज, वातावरण, राजकारण आणि संस्कृतीविषयी अनेक महत्वाचे प्रश्न निर्माण केले आहेत. 'झाडाझडती' ही कांदबरी केवळ एकाच भूप्रदेशातील मर्यादित जीवनाला आधोरेखित करते असे नाही. तर संबंध राष्ट्रीय संवेदनेला हात घालताना दिसते. 'झाडाझडती' या कांदबरीचा आशय व अंत:सूत्राविषयी बोलताना प्रा. सुहास निर्मळे म्हणतात की, "विश्वास पाटील यांच्या 'झाडाझडती' या कांदबरीचा आशय व अंत:सूत्र फक्त प्रादेशिक मर्यादेत बसत नाही. नर्मदेपासून ते दक्षिणेकडील कावेरीपर्यंत जी जी धरणे बांधली गेली त्या प्रत्येक धरणाच्या पायाखाली आणि पाण्याखाली अनेक माणसे, गावे, त्यांचे संसार इतरांच्या सुखासाठी गाडले गेले. विस्थापितांचे जगणे त्यांच्या वाट्याला आले. धरणग्रस्तांचे शोषण आणि विस्थापित स्थलांतरीत होणे ही वेदना राष्ट्रीय वेदना आहे. म्हणून 'झाडाझडती' कांदबरीला एक व्यापक परणिाम आहे."[७७] निर्मळे यांनी 'झाडाझडती' कांदबरीची व्यापकता सांगताच तिच्यात साकारणारी वेदना ही सर्वसमावेशक कशी आहे हे सांगितले आहे. तसेच 'झाडाझडती' या कांदबरीने वाङ्मयीन स्वरुप स्पष्ट करताना विषयाचे महत्व, विशेष आणि मुल्यामापन केलेले आहे असे दिसते.

९. राघववेळ :

दलित साहित्यप्रवाहातील आजच्या पिढीचे एक प्रभावशाली व्यक्तिमत्व म्हणजे नामदेव काबंळे होत. दलित जीवनाला आणि त्या जीवनातील प्रखर वास्तवाला आपल्या लेखनीने बोलके करण्याचा नामदेव कांबळे यांनी मातंग समाजातील एका जिद्दी स्त्रीची जीवनकाहाणी 'राघववेळ' या कादंबरीतून व्यक्त केली आहे. नामदेव कांबळे यांनी १९९४ साली ही कांदबरी लिहिली आहे. आणि १९९५ चा साहित्य अकादमी पुरस्कारही या कांदबरीला मिळाला. पुरस्कारप्राप्त 'राघववेळ' ही कादंबरी अनेक दृष्टीने महत्वाची ठरली आहे. वर्तमान जीवनात वास्तवाचा वेध घेणारी नामदेव कांबळे यांची 'राघववेळ' ही नव्वदीच्या दशकतील भयान समाजवास्तवाला प्रतिबिंबीत करते. कसल्याही प्रकारची लेखनपरंपरा नामदेव कांबळे यांच्या घराण्याला नव्हती. अज्ञान आणि अंध:कारात सापडलेल्या आपल्या घराला नामदेव कांबळे यांनी प्रकाशाची ज्योत दाखविली. म्हणूनच तळा-गाळातील अस्पृश्यांची जीवनव्यथा, वेदना तेवढ्याच परखडपणे या कादंबरीने मांडल्या व ती 'साहित्य अकादमी' पुरस्कारास पात्र ठरली आहे.

मराठी साहित्यविश्वात अपरिचित असणाऱ्या एका प्रतिभावंत आणि प्रगल्भ साहित्यिकाचा परिचय मराठी विश्वाला झाला तो नामदेव कांबळे यांच्या 'राघववेळ'ला मिळालेल्या साहित्य अकादमी पुरस्कारामुळे. आपल्या लेखनविश्वात 'राघववेळ' शिवाय 'ऊनसावली' आणि 'सांजरग' या कांदबरीचीही निर्मिती त्यांनी केली आहे. भाषाशैली, निवेदन, व्यक्तिचित्रण, कथानक या सर्वच पातळ्यांवर नामदेव कांबळे यांच्या कादंबऱ्यांनी आपले वेगळेपण सिद्ध केले आहे. दलित कांदबरीच्या प्रवाहातील कलात्मक पातळी गाठणारी एक महत्वपूर्ण कादंबरी म्हणून 'राघववेळ' कादंबरी विचारात घेतली गेली.

१९६० नंतर साहित्याच्या विश्वात अमूलाग्र बदल झाला. ग्रामीण-दलित साहित्याच्या प्रवाहाबरोबरच इतर साहित्यप्रवाह उदयास आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार प्रेरणेतून दलित साहित्यिकांनी आपल्या जीवन वास्तवाला लेखनीचा विषय बनविले. मराठी साहित्याच्या विश्वातील नव्वदीच्या दशकातील एक कादंबरीकार म्हणजे 'नामदेव कांबळे' होत. नामदेव कांबळे यांच्या समकालीन लेखकांच्या लेखनात नामदेव कांबळे यांचे लेखन आशयसंपन्न आणि प्रत्ययकारी ठरल्यानेच त्यांच्या कादंबरीस अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाल्याचे मान्य करावे लागते. आपला समाज आणि त्या समाजातील विविध वृत्ती- प्रवृत्तींना केंद्रस्थानी ठेवून लिहिलेली 'राघववेळ' ही कादंबरी अनेक प्रकारच्या माणसांचे मनोवेधक दर्शन घडविते, हे सांगतानाच डॉ. ज्ञानेश्वर थोरात म्हणतात की, "राघववेळ' या कादंबरीत काही ठळक जातीची माणसे दिसतात. जगदीश सरपंच, पाडुरंग पाटील, गोपाळराव देशमुख, जाधव आणि वाणी, मारवाडी, धनगर, लिंगायत, माळी, कलाल, न्हावी, फकीर, महार, मांग, चांभार इ. जातीची माणसे कादंबरीतून दिसतात." 'राघववेळ' या कांदबरीतून घडणाऱ्या विविध जाती, जमातींच्या माणसाना 'राघववेळ' कादंबरी नामदेव कांबळे यांनी कसे एकत्रित विणले आहे हे सांगितले आहे. 'राघववेळ' या कादंबरीच्या कथानकाला विचारात घेऊन कांदबरीच्या अंतरंगाचा विचार करता येईल व ही कादंबरी 'साहित्य अकादमी' पुरस्कारास कशी सिद्ध झाली हे स्पष्ट करता येते.

१०. ताम्रपट :

'रंगनाथ पठारे' हे मराठी साहित्यात एक नामवंत कथा, कांदबरीकार म्हणून प्रसिद्ध आाहेत. पठारे यांनी राजकीय, सामाजिक जीवनाला चौफेर दृष्टिने अतिशय चिंतनशील वृत्तीने साकार केले आहे. जवळ-जवळ पंचवीसच्या असपास ग्रंथांचे लेखन करणारे पठारे कथा आणि कांदबरी या साहित्यप्रकारात विपूल लेखन करताना दिसतात. १९८२ साली 'दिवे गेलेले दिवस' या कांदबरी लेखनाने आपला प्रवास सुरु करणारे पठारे आज यशस्वीतेच्या शिखरावर पोहचलेले दिसतात. तर 'अनुभव विकणे आहेत' या १९८३ साली प्रकाशित झालेल्या त्यांच्या कथासंग्रहापासून त्यांचा कथालेखनाचा प्रवास सुरु झाल्याचे दिसून येते. आपल्या लेखनाने चर्चिले गेलेले पठारे कधी नावाजले गेले तर कधी

त्यांना प्रक्षोभासही सामोरे जावे लागले. अशा या प्रवासात त्यांच्या प्रतिभेने मात्र उच्च दर्जाच्या निर्मितीची कास सोडली नाही आणि म्हणून पुढे त्यांच्या 'ताम्रपट' कादंबरीस 'साहित्य अकादमीचा' पुरस्कार मिळाला आणि खऱ्या अर्थाने पठारे यांच्या लेखनाचा गौरव झाला.

'ताम्रपट' ही १९९४ साली प्रकाशित झालेली कांदबरी अभ्यासकांनी कौतुकास पात्र ठरविली तर वाचकांनी तिच्यावर आरोप-प्रत्यारोप केले. एकुण ८५१ पृष्ठांमधून या कांदबरीचे लेखन चाळीस वर्षांचा पट या कांदबरीतून चित्रित झाला आहे.

पांरपरिक कांदबरीचा घाट बाजूला करुन कुटुंबकेंद्री, व्यक्तिकेंद्री स्वरुपाच्या चौकटी मोडून विस्तृत अनुभव प्रकट करण्याचा प्रयत्न करणारी 'ताम्रपट' कांदबरी जीवनातील अनेकांगाना सामावून घेताना दिसते. १९४२ पासूनचा स्वातंत्र्यलढा ते १९७९ म्हणजे जवळ जवळ चाळीस वर्षाचा कालखंड कांदबरीतून आला आहे. १९४८, १९५७, १९६८, १९७५ आणि १९७९ असे या कांदबरीचे भाग आहेत. समाजातील राजकारण, सामाजिक, नैतिक जीवनमूल्य, कौटुंबिक-जीवन व्यवहार, अंतरिक संघर्ष, अनैसर्गिक विषमता, मानवी समाजाला पोखरणारी आधुनिक जीवनसंस्कृती आणि पारंपारिक मूल्यांचा होत जाणारा ऱ्हास, अशी कादंबरी राजकारण आणि समाजकारण त्याचबरोबर व्यक्ती आणि त्याचा व्यवहार कशी आधोरेखित करते हे सांगताना, अरुणा दुभाषी म्हणतात की, "सामान्य कार्यकर्त्यापासून ते मुख्यमंत्र्यांपर्यंत अनेक पातळ्यांवरील राजकारणाचे हे चित्र हा कांदबरीच्या अनुभवविश्वाचा एक महत्वाचा भाग आहे. त्यामुळे आत्ताचे राजकीय आणि सामाजिक वास्तव कसे घडले त्याचे प्रत्यंतर ही कादंबरी देवू शकते. सामान्य माणसाला ऐकून माहित असणारा हा तपशील, येथे महाराष्ट्राच्या एका प्रतिनिधिक स्वरुपाच्या तालुक्यातील राजकीय घटनांच्या आणि व्यक्तिरेखांच्या रुपाने प्रत्यक्ष अनुभवता येतो. साहजिकच कांदबरीचा हा भाग लक्ष वेधून घेणारा आहे." दुभाषी यांनी 'ताम्रपट' कांदबरीत राजकारण हे बदलत्या सामाजिक वास्तवाला कसे केंद्रस्थानी ठेवते तेच सांगितले आहे.

राजकीय, सामाजिक तसेच आर्थिक जीवनाला घेवून साकारणारी 'ताम्रपट' ही कादंबरी मानवी जीवनातील विविध घटना व घडामोडींना कथन करते. अतिशय प्रभाविपणे मानवी जीवनाला अभिव्यक्त करणारी कथा रंगनाथ पठारे यांनी 'ताम्रपट' कांदबरीतून कथन केली आहे. 'ताम्रपट' कांदबरीचे कथानक पुढीलप्रमाणे विचारात घेता येईल.

११. तणकट :

'राजन गवस' हे विसाव्या शतकातील शेवटीच्या दोन दशकांतील एक महत्वाचे कांदबरीकार आहेत. राजन गवस यांनी कथा, कांदबरी आणि समीक्षा या तिन्ही प्रांतात स्वतःची एक वेगळी ओळख आहे. अतिशय समृद्ध आणि प्रभावी असे लेखन राजन गवस यांनी केले आहे. आपला समाज आणि त्या समाजाचे जगणे याला अतिशय नेमकेपणाने ते व्यक्त करताना दिसतात. राजन गवस यांनी ते ज्या कोल्हापूरच्या परिसरात राहातात, तिथे गेल्या अनेक वर्षांपासून जोगतिणींचे, वाघ्या-मुरळीचे सामाजिक प्रश्न, समाजाविषयी आस्था असणाऱ्या लोकांना अस्वस्थ करणारे होते. अशा लोकांपैकीच राजन गवस हे एक आहेत. समाजातील या प्रश्नाला केंद्रस्थानी ठेवून त्या आत्मनुभूतिविषयीचा आत्माविष्कार लेखनात घडविला आहे. राजन गवस यांनी 'हुंदका', 'चौंडकं', 'भांडारभोग', 'धिंगाणा', 'कळप' आणि 'तणकट' अशा कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यांच्या 'तणकट' कादंबरीला 'साहित्य अकादमी' चा पुरस्कार देवून गौरविण्यात आले आहे.

राजन गवस यांच्या सामाजिक जगण्याचा आत्मविष्कार घेवून साकारलेली 'तणकट' ही कांदबरी तिच्यातील गुणवैशिष्ट्यांमुळे म्हणूनच नावारुपाला आली आहे. राजन गवस यांच्यावर साठोत्तर कालखंडातील अत्यंत प्रभावशाली लेखक भालचंद्र नेमाडे यांच्या वाङ्मयीन विचारांचा आणि कर्तृत्वाचा मोठा प्रभाव होता. तो प्रभाव त्या कालखंडाच्या एकूणच साहित्यिकांवर असलेला दिसून येतो. अशा या महान लेखकाच्या प्रभावातून घडलेल्या गवस यांच्या प्रतिभेने समाजातील वास्तवतेवर अचूक बोट ठेवत 'तणकट' कांदबरीची उभारणी केली आहे.

ग्रामजीवनाला व त्यातील भयावह प्रश्नाला परंपरेपासून अनेकांनी सामोरे आणण्याचा प्रयत्न केला आहे. या साऱ्या विचारविश्वाच्या व भावविश्वाच्या धरतीवर उभारलेली 'तणकट' ही राजन गवस यांची कादंबरीही आपल्या सांस्कृतिक जीवनातील एका महत्वाच्या प्रश्नावर प्रकाश टाकताना दिसते. गाव आणि गावकुसाबाहेरील जीवन यातील ताण-तणाव, क्रिया-प्रतिक्रिया, साद-पडसाद यांनी साकारलेली कादंबरी जीवनाच्या वास्तवतेला चित्रित करते. गाव आणि गावकुसाबाहेरील समाज यांना अतिशय प्रत्ययकारीतेने 'तणकट' कांदबरीतून व्यक्त केलेले आहे व राजन गवस यांनी मानवी वृत्ती-प्रवृत्तींच्या वैविध्याचाही आढावा घेतला आहे. तसेच समाजातील जातीयतेवरही प्रकाश टाकला आहे. 'तणकट' कादंबरीतून साकारलेल्या वैविध्यपुर्णतेविषयी सांगताना डॉ. किशोर सानप म्हणतात, "तणकट' ही कळप पेक्षा अधिक घट्ट आणि सुबंद्ध अशी, घटनाप्रसंग आणि त्यामागच्या भुमिकांनी साकारझालेली, समाजाचे समकालीन वास्तव मांडणारी कृती आहे." डॉ. किशोर सानप यांनी 'तणकट' ही कांदबरी समकालीन वास्तव आणि त्या समाजातील माणसाच्या असणाऱ्या भूमिका कशी सामोरे आणते हे सांगीतले आहे.

घटना-प्रसंग, निवेदन, भाषाशैली, आशय, पात्र-चित्रण अशा सर्वच घटकात 'तणकट' कांदबरी आपले वेगळेपण सिद्ध करते म्हणुन राजन गवस यांच्या समकालीनात तीला विशेषत्वे महत्व प्राप्त झाल्याचे दिसून येते. समकालीन जीवनाला त्यातील घटना, प्रसगांना वास्तवतेने रेखाटणाऱ्या व्यक्तिरेखा कांदबरीतील आशयाला बोलके करतात. 'तणकट' कांदबरीच्या या वैविध्यपूर्ण कथानकाची ओळख करुन घेवून पुढे जाता येते.

१२. डांगोरा एका नगरीचा :

त्र्य. वि. सरदेशमुखांनी कथा, कांदबरी, काव्य, समीक्षा, अनुवाद, लेखन मराठी साहित्यात केलेले आहे. ही एक प्रदीर्घ कादंबरी आहे. मानवी जीवनाचा, समाज जीवनाचा पन्नास-साठ वर्षाचा अवकाश या कादंबरीस लाभला आहे.

या कादंबरीच्या लेखनामागची भूमिका स्पष्ट करताना या कादंबरीच्या मनोगत लेखनात सरदेशमुख म्हणतात, 'डांगोरा:एक नगरीचा' मधील काही 'बखर एका राजाची' या कादंबरीच्या पुढला प्रवास आहे. तिचे संविधानाक दीर्घकाळ मनात रुजत होते. आधीची पीठिका सांगितल्यावाचून त्याचे अंतरंग पुरते उमलणार नाही, म्हणून राजेरघुवीरसिंहाची बखर प्रथम सांगायला घेतली. तिचे निवेदन आत्मपर होते, त्यामुळे कांही साधले, काही निसटले, येथे पहिल्या भागात भरपाई करुन पाहिली आहे.

"बखर एका राजाची,' 'डांगोरा एका नगरीचा' आणि 'उच्छाद' या त्रयीने १९१० ते १९६० हा कालावधी व्यापला आहे. साईखेडच्या या दर्शनात आपल्या सामाजिक जीवनाचा वर्तमानाला लगत असा एक अंश प्रकट होतो. वर्तमान भूत-भविष्य लपलेले असते. तिन्ही कृती आपापल्या जागी स्वयंपूर्ण वाटाव्या, तरी पूर्वापरसंबंधातली एकात्मता साधली जावी अशी रचना संकल्पिली आहे."

सरदेशमुखांनी 'बखर एका राजाची' ही कादंबरी लिहिली. या कादंबरीत रघुवीरसिंह राजाची कहाणी कथन केली पण त्यांच्या दृष्टीने या कादंबरीतील कथावास्तू विशाल वाटत होती काहीतरी जीवनदर्शन अपुरे वाटत होते. म्हणून त्यांनी 'बखर एका राजाची' ही कांदबरी जिथे थांबते, तेथून पुढचा प्रवास 'डांगोरा: एका नगरीचा' या कादंबरीने सुरु होतो. राजे रघुवीरसिंहाच्या जीवन कहाणी चित्रणाबरोबर त्यांना एका साईखेड संस्थानातील समाजजीवन उभे केले आहे. या कादंबरीचा मुख्य कथाआशय कादंबरीच्या मनोगतात सांगताना सरदेशमुख म्हणतात की, "परिवर्तन ही सृष्टीतली शाश्वतची स्वाभाविक प्रक्रिया आहे. नियोजीत संकेतानुसार ते व्हावे यासाठी माणसांना जाणीवपूर्वक चळवळ करावी लागते. ती न्यायप्रिय, सत्यान्वेषी आणि समतेचा पाठपुरावा करणारी व्हावी यासाठी झटावे लागते. अन्यथा तिच्या प्रयोजनातले निर्मळपण हरवते आणि परिणामात दोष, विध्वंस आणि रक्तपातही भरुन येतात. प्रगती म्हणजे केवळ चैनसुखाची समृद्धी या कल्पणेने माणसे धनलोभी, सत्तापिपासू, आणि वामाचारी होतात मग चळवळी कडवटपणाच्या व सूडबुद्धीच्या वाटेने जातात." वरील मतातून कांदबरीचे स्वराज आणि समाज-जीवनातील वास्तवता चिंतनशिल वृत्तीने व्यक्त केलेली आहे.

मानवी जीवन कधी सरळ नसते. कडवटपणा हा प्रत्येक मानवी जीवनात मुरलेला असतो. सत्ता हाती आली की, कडवटपणाचा अतिरेक होतो. संस्थाने ढासळू लागतात. मानवी मनातील परिवर्तन घडत जाते तसे समाजातही परिवर्तन घडून येते. मानवी जीवनातील 'कडवट सत्य' ही कादंबरी सांगून जाते. माणसे स्वार्थी, सत्तालोभी असतात याकामी वेळप्रसंगी हत्या, रक्तपात, विध्वंसही घडून येतो. हा या कादंबरीचा मध्यवर्ती आशय अभिव्यक्ती असल्याचे दिसून येते.

या कादंबरीत राजसच्या प्रेमाचा त्रिकोण वर्णन केलेला आहे. राजस शेवटी अरविंदच्या स्वीकार करते. इथेच सरदेशमुख एका नव्या युगाची, परिवर्तनाची सूचना करतात. या संदर्भात सरदेशमुख मनोगतात लिहितात, "सत्याचा उदय व्हावा आणि तामसिकता अस्ताला जावी असा ध्यास घेतला तरच परिवर्तन संजीवक, संवर्धक आणि संतोषक होते ." कोणत्याही समाजाचे किंवा समुहविशेषाचे लाभ तात्काळ नसतात. परिवर्तन अटळ असते. या आशयसुत्राभोवती 'डांगोरा एका नगरीचा' या कादंबरीत कथावस्तू गुंफली गेली आहे.

१३. बारोमास :

सदानंद देशमुख हे मराठी वाचकांना परिचित असलेले नव्वदच्या दशकातील एक मोठे नाव आहे. कथा, कादंबरी या क्षेत्रांत लेखन करणारे सदानंद देशमुख त्या काळातील समकालीनात स्वत:ची वेगळी ओळख निर्माण करतात. सदानंद देशमुखांनी ग्रामीण जीवनातील बदलाला केंद्रस्थानी ठेवून लेखन केल्याने ग्रामीण जीवनातील विविधांगी चित्रण करणारे त्यांचे लेखन म्हणूनच लौकिकास पात्र ठरते. देशमुखांच्या या प्रतिभासंपन्नतेतून साकारलेल्या 'बारोमास' कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कारही मिळाला आहे. ग्रामीण जीवनातील आजच्या बदलत्या तरुणांच्या मानसिकतेचे वास्तव चित्रण सदानंद देशमुखांनी या कांदबरीतून स्पष्ट केलेले आहेत.

उद्धव शेळके, बाजीराव पाटील, मनोहर तल्हार, बाबाराव मुसळे, नामदेव कांबळे, पुरुषोत्तम बोरकर, रमेश अंधारे, रविंद्र शोभणे अशी वैदर्भिय ग्रामीण कादंबरीकाराची मोठी परंपरा आहे. या परंपरेतच स्वत:चे वेगळे अस्तित्व सदानंद देशमुखांनी सिद्ध केले आहे. सदानंद देशमुखांनी विदर्भातील वऱ्हाडी बोलीला प्राधान्य देऊन विदर्भातील ग्रामीण जीवनाचा सखोलतेने वेध घेण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. सदानंद देशमुख स्वत: शेतकरी कुटुंबात जन्माला आल्याने त्यांचे लेखन वास्तवतेच्या कसोटीवर उतरते. त्याविषयी डॉ. किशोर सानप म्हणतात, "बारोमासला लेखकानं कटु सत्य म्हणून एक निवेदन जोडलं आहे. लेखक स्वत: शेतकरी असल्यामुळे आणि शेतीशी निगडीत परिवारातून तो पुढे आल्यामुळे त्यांना शेतीचे कटू सत्य कळलेलं आहे. मनातले शल्य तो सांगत आहे. शेतीची विकोपाला गेलीली अर्थव्यवस्था आणि तिच्या समस्या लेखकाने मांडल्या आहेत आणि त्यावरचे आपले चिंनशील उपायही सूचविले आहेत." डॉ. सानप यांनी लेखकाच्या अंतर्मनाचा वेध घेतलेला आहे. लेखक स्वत: हे जीवन जगल्यामुळे आणि अनुभवल्यामूळे त्याने या जीवनातील वास्तव अतिशय प्रत्ययकारीतेने व्यक्त केलेले आहे.

'बारोमास' शेतकरी जीवनाला भोगाव्या व सोसाव्या लागणाऱ्या व्यथा सदानंद देशमुखांनी 'बारोमास' कादंबरीतून मांडल्या आहेत. शेतकऱ्यांच्या या व्यथांना कारणीभूत ठरलेल्या प्रश्नांचा मागोवाही तेवढ्याच परिणामकारकतेने देशमुख घेतात, आणि ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्र डोळ्यांसमोर उभे करतात. ग्रामीण जीवनाने आधुनिकरणाचा केलेला स्विकार त्यांच्या जीवावर कसा उठला आहे हे बारोमास कादंबरीतून प्रभाविपणे सांगितले आहे. खेड्याचे जीवनमान शहरातले नागरी जीवनमान अंगिकारत असल्याने माणसाचं माणूसपण हरवत चालल्याची खंत

प्रस्तुत कादंबरीतून व्यक्त झालेली आहे. तसेच दिखाऊ आणि चमकदार जीवनशैली स्वीकारुन जुने सर्वच नाकारणाऱ्या नव्या पिढीपुढे निर्माण होणाऱ्या अनेक समस्यांचाही वेध सदानंद देशमुख घेताना दिसतात. एकूणच सदानंद देशमुखांनी खेड्यात होत जाणारे बदल खेड्याच्या विनाशाला कारणीभूत ठरणारे कसे आहेत, हेदेखिल सुक्ष्म व विवेचनात्मक दृष्टीने स्पष्ट केले आहे.

भारतीय समाजजीवनातील खेड्यांची वर्तमान स्थिती रेखाटणारी ही कादंबरीची कथा अनेकांना सुन्न करुन सोडते. ही एक शोकात्मिका आहे. भारतीय कृषी संस्कृतीला लागलेले ग्रहण क्थन करणारी 'बारोमास' कादंबरीची कथा वेगवेगळे पदर कशी उलगडत जाते,भारतीय कृषिसंस्कृतीच्या पडझडीची ही दारुण गाथा लेखकानं पिढ्यांच्या माध्यमातून सांगितली असली तरी, मुख्यत: एकनाथच्या सर्वसमावेशी आणि परिपक्व अनुभवांतून आणि दृष्टीकोनातून सांगितली आहे. सदानंद देशमुख हा लेखक आणि कादंबरीचा नायक एकनाथ यात समानबिंदू असतील ही आहेतच. पण ही कादंबरी आत्मकथात्मक कादंबरी नव्हे हे अवर्जून कशासाठी सांगावेसे वाटते, की ही अनेक आयामी संस्कृती कथा आहे. आत्मानुभव कलेच्या पातळीवर नेताना व्यक्तिगततेच्या कक्षा ओलांडत अनुभवाला विस्तार देऊन प्रतिकात्मकता देऊन, वैश्विकरुप देऊन कलानुभवाची पातळी दिलेली आहे. एकनाथची ही कथा कुटुंबाच्या विघटनाची कथा आहे, कृषी संस्कृतीच्या दारुण अवस्थेची कथा आहे. 'बारोमास' ही कादंबरी जीवनातील विविधांगांना कसे कथन करते, हे सांगितले आहे. भारतीय कृषी संस्कृतीचे आणि ग्रामसंस्कृतीचे येथील शेतकऱ्यांचे जीवनदर्शन वास्तववादी भूमिकेतून व्यक्त केल्याचे दिसून येते.'बारोमास' ही सदानंद देशमुखांची ग्रामीण कादंबरी आहे. तहान आणि बारोमास या कादंबऱ्यांमधून त्यांनी शेतकऱ्यांच्या जीवनातील खरे वास्तव व कटू सत्य सांगण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. या कादंबरीच्या वाङ्मयीन गुण-विशेषांचा अभ्यास पुढीलप्रमाणे करता येईल.

सारांश:

शेवटी सारांश रुपाने सांगता येते की, मराठी साहित्याच्या क्षेत्रात कथात्मक साहित्याला एक मोठी परंपरा असल्याचे दिसून येते. या परंपरेचा विकास आणि विस्तार स्वातंत्र्योत्तर काळात मोठया प्रमाणात झाला आहे. स्वातंत्र्योत्तर काळापासून ते आजतागायत अनेक वेगवेगळया कथात्मक साहित्यकृर्तींना अकादमीचा पुरस्कार मिळालेला आहे. या साहित्यकृर्तींचे स्वरुप आणि मुल्यमापनाच्या अंगाने विचार करता या कलाकृती समकालीनात वेगवेगळया घटक वैशिष्टयांमुळे कशी भिन्न ठरल्या आहेत ते स्पष्ट होते. त्याचबरोबर अकादमीने निवडलेली कलालकृती सर्वोकृष्ट तर असतेच शिवाय ती त्या त्या काळातील वाङ्मय प्रवाहाला कशा दिशा देते ते ही स्पष्ट होते. अशा प्रकारे साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कथात्मक साहित्याचे स्वरुप व मुल्यमापन स्पष्ट होते.

निष्कर्ष

- मराठी साहित्याच्या वर्तुळातील एका प्रतिभासंपन्न व्यक्तिमत्व असणारे वि.स.खांडेकर यांची 'ययाति' या आपल्या पौराणिक कादंबरी लेखनाने वर्तमान जीवनाशी कसा संवाद साधतात ते स्पष्ट होते.
- श्री.ना.पेंडसे यांच्या 'रथचक्र' या कादंबरीने प्रादेशिक जीवनाला मराठी साहित्यात एक स्थान कसे निर्माण करुन दिले ते स्पष्ट होते. त्याचबरोबर अकादमीने प्रादेशिक जीवन चित्रणाचे वेगळेपण विचारात घेऊन त्या कलाकृतीचा सन्मान कसा केला आहे ते ही स्पष्ट होते.
- 'स्वामी' या कादंबरीने मराठी ऐतिहासिक कादंबरीत कशी मोलाची भर घातली ते स्पष्ट होतेच शिवाय मराठी ऐतिहासिक कादंबरीला 'स्वामी' कादंबरीने कसे श्रेष्ठत्व बहाल केले ते अकादमीने तिच्या गुणात्मकतेतून स्पष्ट केले आहे.
- साहित्य अकादमीने पु.ल.देशपांडे यांच्या बहुसंपन्नतेची पारख करुन, त्यांच्या वैविध्यपूर्ण, लेखनातून श्रेष्ठत्व सिध्द करणारा 'व्यक्ती आणि वल्ली' हा व्यक्तिचित्रण संग्रह मानवी समाजाच्या विविधतेचे दर्शन घडविण्यासाठी कसा महत्वपूर्ण ठरतो ते स्पष्ट होते.
- साहित्य प्रकाराच्या वेगवेगळया घटकांत आपले वेगळेपण सिध्द करणारी गो.नि.दांडेकरांची 'स्मरणगाथा' आत्मचरित्रपर कादंबरी समकालीन लेखननिर्मितीत कशी वेगळी ठरली आणि पुरस्कारास सिध्द झाली ते स्पष्ट होते.
- मराठी साहित्याच्या वर्तुळात बहुचर्चित ठरलेली आणि मराठी साहित्याला एका नव्या जीवनाचे दर्शन घडविणारी 'सत्तांतर' ही व्यंकटेश माडगुळकरांची कादंबरी तिच्या अंगभूत गुणवैशिष्टयामुळे अकादमीच्या सर्वोकृष्टतेच्या निकषास कशी सार्थ ठरली ते स्पष्ट होते.
- वास्तववादी मराठी कादंबरीला एक नवी दिशा देणारी विश्वास पाटील यांची झाडाझडती कादंबरी वर्तमान माणसाच्या जगण्याचा उभा आडवा छेद घेते आणि म्हणूनच ती गुणात्मकतेचा दर्जा मिळवून पुरस्कारासाठी सिध्द झाल्याचे पटते.
- नामदेव कांबळे यांची 'राघववेळ' ही कादंबरी वर्तमान काळातही दलित समाजाची होणारी शोकांतिक अत्यंत प्रभावीपणे रेखाटून वेगवेगळया वाङ्मय घटकांना समृध्द करुन सोडते. तिच्या या कलात्मक गुणांमुळेच ती समाकालिनात वेगळी ठरुन पुरस्कारासाठी सिध्द होते.
- महाराष्ट्राच्या राजकीय जीवनाचे वास्तवपूर्ण चित्रण करणारी रंगनाथ पठारे यांची ताम्रपट कादंबरी वेगवेगळया मनोवृत्तीला प्रभावीपणे रेखाटते. अकादमीच्या निकषांच्या कसोटीस ती कशी खरी उतरते ते सांगता येते.

- राजन गवस यांची 'तणकट' कादंबरी ग्रामीण समाजातील वेगवेगळया समाजाला अधोरेखित करते तर सदानंद देशमुखांच्या 'बारोमास' मधून आजच्या पिढीतील सुशिक्षित तरुणांची आंतरिक तळमळ स्पष्ट होते. प्रस्तुत दोन्ही कादंबऱ्या आपल्या वर्तमान जीवनाशी इमान राखतात आणि साहित्यिक गुण वैशिष्टयांचीही जोपासना करतात म्हणून त्या कालाकृती साहित्य अकादमी पुरस्कारास पात्र ठरतात ते सांगता येते.

संदर्भ

१) डॉ.बांदिवडेकर चंद्रकांत, देशीवाण, अक्षर प्रकाशन, मुंबई प्र.आ.मार्च २००२, पृ.क्र.४७.
२) तत्रैव,पृ.१००.
३) खांडेकर वि.स.,ययाति, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, आवृत्ती एकतीसावी , पृ.क्र.०४.
४) तत्रैव, पृ.क्र.०४.
५) डॉ.कुलकर्णी द.भि., कादंबरी : स्वरुप आणि समीक्षा पद्मगंधा प्रकाशन, पुणे, पृ.७५.
६) डॉ.बांदिवडेकर चंद्रकांत , उ.नि.पृ.११९.
७) पेंडसे श्री.ना.,रथचक्र, मौज प्रकाशन गृह, मुंबई ,पृ.०१.
८) तत्रैव, पृ.२३.
९) तत्रैव, पृ.२८.
१०) तत्रैव, पृ. प्रास्ताविक.
११) डॉ. वडेर प्रल्हाद, स्वामी : एक शोध, संपा. डॉ.मिरा घाडगे, मेहता प्रकाशन, पुणे, पृ.१९६.
१२) डॉ. मीरा घाडगे, स्वामी : एक शोध, संपा. डॉ.मिरा घाडगे, मेहता प्रकाशन, पुणे, प्रस्तावना, पृ.१५.
१३) डॉ. बांदिवडेकर चंद्रकांत, उ.नि.पृ.११९.
१४) डॉ. घाडगे मीरा, उ.नि.पृ.१९६.
१५) देसाई रणजीत, स्वामी , मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, आवृत्ती सत्ताविसावी, मार्च २००७, पृ.०२.
१६) तत्रैव, पृ.०३.
१७) पाध्ये दिगंबर, मराठी कादंबरी अस्वाद यात्रा,संपा.विजया राजाध्यक्ष, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र.आ.२००८ पृ.७२
१८) देसाई रणजीत, उ.नि.पृ.०८.
१९) तत्रैव, पृ.०३.
२०) तत्रैव, पृ.१५१.